## प्रेसनोट

**अपंगाना ओळखपत्र देणे ही सेवा महाऑनलाईनव्दारे अपंग अर्जदाराचे अर्ज ऑनलाईन भरणेबाबत.**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रं संकीर्ण 2015 /प्र.क्रं 53 / समन्वय/मुबई दिनांक 24/11/2015 अन्वये** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत अधिसुचित सेवा www.aaplesarkar.maharashtra.gov.in या पोर्टलवर महाऑनलाईनव्दारे ऑनलाईन करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.अपंगाचे ओळखपत्र या सेवे करिता या पोर्टलवर जावून आपला स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड तयार करावा. त्याकरिता

1. अर्जदाराचा स्वत:चा आधार आयडीवरुन युजर तयार करता येतो किंवा
2. स्वत:चा ओळखपत्र व रहिवासीपुरावा व फोटो इ. तपशिल भरून युजर आयडी व पासवर्ड तयार करता येतो. सदर युजर आयडी व पासवर्ड तयार केल्यानंतर राज्य शासनाने घोषित केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत अधिसुचित केलेल्या सर्व योजनेकरिता लाभार्थ्याच्या पात्रतेनुसार सदर अर्जदाराला ऑनलाईन अर्ज करता येतो. याकरिता लाभार्थी स्वत:ऑनलाईन अर्ज करू शकतो किंवा महाऑनलाईन अधिकृत सेवा केंद्रावर जावून नियमानुसार अर्ज करु शकतो. दिव्यांग लाभार्थीनी ऑनलाईन अर्ज भरावेत असे **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प,लातूर यांनी आवाहन केले आहे.**

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर